NAVJYOT / Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन

**डॉ.संदीप रंगनाथ तापकीर**

मराठी विभाग, जयसिंगपूर कॉलेज,जयसिंगपूर भ्रमणध्वनी—९९२२४५८९७४

e-mail-sandiptapkir12@gmail.com

भारतीय स्वातंत्र्य लढ्यतील अग्रणी राहिलेले थोर राजकारणी,ग्रेट फिलॉसॉफर, द्रष्टा राजकारणी, सत्याग्रह आणि असहकार ही नवी अयुधं जगाला देणारा लढावय्या नेता, 'अहींसेचे आजन्म पालन करणारा धर्मनिष्ठ, जवळजवळ सबंध जगभर पसरलेल्या बलाढ्य ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारा संत महात्मा म्हणजे मोहनदास करमचन्द गांधी. जगभरात प्रचंड लोकप्रियता ज्यांच्या वाट्याला आली अशा थोर मान्यवरांच्या मांदियाळीतील एक अग्रणी नाव. गांधींच्या शब्दावर लोकांचा प्रचंड विश्वास होता. त्यांच्या एका हाकेसरशी काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत आणि असाम पासून पेशावरपर्यंत अखंड हिंदुस्तानातील जनता पेटून उठत असे. लोकप्रियता एवढी होती की त्याकाळी तरूणांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणायचे भारतात माझ्या सभांना प्रचंड गर्दी होते परंतू कोणत्याही सभेत 'पंडित नेहरू की जय' अशी घोषणा लोक कधीच देत नाहीत.

१९३० साली महात्मा गांधी कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यावेळी कॉंग्रेसमध्ये मोतीलाल नेहरू ,लाला लजपतराय,मदन मोहन मालवीय, बिपिन चंद्रपाल , बॅ. जिना असे कितीतरी नेते गांधींपेक्षा अधिक काळ कॉंग्रेसमध्ये काम केलेले होते.या सगळयांना डावलून गांधी अध्यक्ष झाले ते त्यांच्या प्रचंड 'बोले तैसा चाले ' ह्या त्यांच्या लौकीसिध्दिमुळे. उदाहरणच द्यायचे तर लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांचे स्मारक उभारण्यासाठी गांधींनी जनतेतून एक कोटी रुपयांचा फंड गोळा करण्याचे आवाहन कॉंग्रेसजण आणि सामान्य जनतेला गेले. त्याला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला. ही मुदत संपली त्यावेळी टिळक फंडात ९७ लाख रुपये जमा झालले होते. सरदार वल्लभभाई पटेलांचे मोठे भाऊ विठ्ठलभाई पटेल यांनी गांधींना सुचवले की तीनच लाखांचा प्रश्न आहे,ते कधीही जमा होतील. आपण टिळक फंड पूर्ण झाल्याची घोषणा करून टाकू, गांधींनी असे करायला साफ नकार दिला. उरलेल्या सात—आठ तासात हे तीन लाख रुपये जमा झाले नाहीत तर जमा झालेले सगळे पैसे लोकांना परत करून टाकायचे , असा निर्णय त्यावेळी गांधींनी घेतला . 'बोलेल तसाच करेल' हे गांधींचे वेगळेपण त्यांना महात्मा बनवते.

संत —महात्मा, तत्त्वज्ञ, राजकारणी,सत्याग्रही म्हणून आपल्याला माहित असलेले गांधी एक द्रष्टा शिक्षणतज्ञ होता , हे आपल्यापैकी अनेकांना माहितही नाही. गुरुकुल शिक्षण पद्धती आणि आधुनिक शिक्षण पद्धती यांच्यामधील अभंग सांधा म्हणजे गांधींचे शिक्षण विषयक विचार आहेत. द.आफ्रिकेत १९१५ साली महात्मा गांधींनी कोचराब येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली. तेथूनच त्यांच्या शैक्षणिक,राजकीय, सामाजिक कार्याची सुरुवात झालेली दिसते. गांधींचे आश्रम म्हणजे एका अर्थाने लोक—शिक्षणाचे धडे देणा—या शिक्षण संस्थाच होत्या. भरतात गांधींच्या सत्याग्रहास मोठे यश प्रथम प्राप्त झाले ते बिहारमधील चंपारण्यच्या सत्याग्रहापासून तेथे त्यांनी 'चंपारण्य' नावाचा आश्रम काढला. ग्रामशिक्षणाचा तो गांधींचा पहिला प्रयत्न होता. त्यावेळी बिहारमध्ये अंधश्रद्धा,अज्ञान, वाईट प्रथा, अनारोग्य अशा अनेक समस्या होत्या. गांधींनी ग्राम—प्रमुखांच्या मदतीने आणि ग्राम—शिक्षणाच्या माध्यमातून लोकांच्या या समस्येच्या निर्मूलनचा प्रयत्न केला. १९२० साली त्यांनी गुजरात विद्यापीठाची अहमदाबाद येथे स्थापना केली. या ठिकाणी प्राथमिक शिक्षणापासून पीएच.डी. पर्यंतच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. गांधींच्या द. आफ्रिकेतील 'फिनिक्स' आणि टॉलस्टॉय या आश्रमांमधून सामूहिक जीवन कसे जगावे,त्याचे फायदे कोणते आहेत, त्याची गरज का आहे ,शेतीविषयक मूलभूत ज्ञान कसे संग्रहित करावे, कठोर परिश्रमातून परिवर्तन कसे घडून आणावे या विषयाचे लोकशिक्षण दिले जात असे. १९०४ मध्ये द.आफ्रिकेत स्थापन झालेल्या फिनिक्स या आश्रमाच्या माध्यमातून भाईचारा—शांततेच्या मार्गाने जीवन कसे जगावे याविषयी लोकांना शिक्षण दिले गेले. या आश्रमात विविध खेळ देखील खेळवले जात होते. एका निरोगी शरीरातच एक निरोगी मन राहू शकते,त्यादृष्टीने शारिरीक कसरतीचे संस्कार करण्याचे हे महत्वपूर्ण कार्य होते.

जगातील जवळपास सहाशेहून अधिक विद्यापीठात गांधी आणि गांधी विचार शिकवला जातो. गांधींचे विचारांना अभ्यास आणि कृतीची जोड होती. त्यांच्या जडणघडणच मुळी फार प्रतिभा संपन्न माणसांच्या प्रभावा खाली झालेली होती. जगप्रसिद्ध तत्त्ववेत्ता टॉलस्टॉय याचा गांधीवर फार प्रभाव होता. त्या प्रभावातूनच त्यांनी आफ्रिकेत असताना टॉलस्टॉय आश्रमाची स्थापना केली. आणि त्या अंतर्गत भाईचारा शांततेच्या मार्गाने जीवन कसे जगावे याची शिकवण त्यांनी तेथील तमाम लोकांना दिली दक्षिण आफ्रिकेत त्यांनी जे आश्रम काढले त्यातून सामूहिक जीवनाचा प्रयोग सामान्य सामाजिक जागृती सामाजिक जबाबदारी शेतीसंबंधी ज्ञान समप्रतिष्ठा याविषयी लोकांमध्ये त्यांनी जनजागृती केली.

१९१५ साली त्यांनी गुजरात मधील अहमदाबाद येथील ‘कोचरा’ या गावी सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली. गांधी भारतात आल्यावर नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्यासारख्या एका प्रचंड हुशार,विद्वान शिक्षकाच्या बुद्धी–वैभवामुळे प्रभावित झाले आणि त्यांचे वैचारिक अनुयायी बनले. गांधींचे विचार हे जगभर अभ्यासले गेले याचे कारण त्यांच्या विचारांमागे तात्विक अधिष्ठान आणि कार्यकारणभावाचा विचार होता. त्यांच्या संपर्कात आलेल्या अनुयायांची नुसती नावे पाहिली तरी आपल्याला या माणसाची विद्वत्ता काय असेल याची कल्पना येते. विलायतेहून शिकून आलेले पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, वयाच्या अठराव्या वर्षी कुराण शरीफवर विस्तृत भाष्य लिहून मक्कामदीनेस सादर केले आणि ‘अब्दुल कलाम’ ही पदवी संपादन करणारे मौलाना अब्दुल कलाम आझाद यासारखे लाखो विद्वान गांधींचा शब्द प्रमाण मानत होते. आईन्स्टाईन सारखा त्यावेळचा जगद्विख्यात तत्त्ववेत्ता म्हणतो, “ गांधी या नावाचा माणूस पृथ्वीतलावर आपली पावले उमटून गेला, यावर उद्या कदाचित कोणी विश्वासही ठेवणार नाही ” टॉलस्टॉय स्वतः त्यांचा सल्ला घेत असे. रवींद्रनाथ टागोरांनी त्यांना महात्मा म्हटले. एवढया सगळया प्रज्ञावंतांवर गांधींचा प्रभाव होता याचे कारण ते स्वतः प्रखर बुद्धिमत्तेचे प्रज्ञासंपन्न विचारवंत होते. गांधींनी ज्या ज्या क्षेत्राविषयी विचार व्यक्त करून ठेवलेले आहेत त्यामागे त्यांचे निरिक्षण,अनुभव,अभ्यास आणि चिंतन असल्याने आजच्या परिप्रेक्षकात त्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा याविषयी कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

म.गांधींचे शिक्षण विषयक विचार इथल्या मातीशी इमान राखून व्यक्त झालेले आहेत. इंग्रजीच्या अतिप्रेमाने भरकटलेली आजची पिढी पाहता गांधींच्या शिक्षण विषयविचारांचा बारकाईने अभ्यास व्हायला हवा हे उघड आहे. गांधीजींच्या मते केवळ साक्षरता किंवा अक्षर ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे. केवळ अक्षरज्ञान ही शिक्षणाची साधी सुरवातही मानायला ते तयार नाही. अक्षर ज्ञान कींवा साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे ,असे ते म्हणतात.

केवळ अक्षरज्ञान म्हणजे साधन–सुचिता, स्वार्थ–ढोंग , तुच्छता हे केवळ अक्षर ज्ञानामुळे उत्पन्न होतात असे त्यांचे स्पष्ट मत होते. ‘ हिंदू–स्वराज्य’ या छोट्यशा पुस्तकेत त्यांनी यासंदर्भातील वितृत विवेचन केलेले आहे. अक्षरज्ञानामुळे आपण सुखी होतो, हा केवळ गैरसमज आहे असे त्यांना वाटत होते. एखाद्या शेतक–याला साक्षर करून तुम्ही काय साधणार ? शेतकरी आपल्या श्रमावर, घामावर श्रद्धा ठेवून काळ्या मातीची सेवा प्रमाणिकपणे करतो. घाम गाळून फुलवलेल्या पिकात तो परमेश्वराचे अस्तित्व अनुभवतो. आपल्या कुटुंबावर मनोभावे प्रेम करतो. आलेल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देतो. सहजीवनाचा आनंद लुटतो. निसर्गाशी तादम्य साधून रहातो. सगळे जीवन समरसून जगतो. मग त्याला सही करता येत नाही म्हणून कमी लेखायचे का ? शेतक–यास मातीचे, हवामानाचे ,पर्यावरणाचे चांगले ज्ञान असते. बाजारभाव,हवामान, पिकांचा जमा खर्च या सगळयाचा तारतम्यभाव ,व्यवहार ज्ञान त्याच्याकडे असते कुटुंब वत्सलता,सहजीवन हे तो समरसून जगत असतो. त्याला त्याची झोपडी, त्याचे कुटुंब, त्याची अंगमेहनत याविषयी त्याच्या मनात तिरस्कार निर्माण करणार. त्याच्या मनात तो जे काही करतो त्याच्याविषयी घृणा निर्माण करणार अंगमेहनत म्हणजे ढोरकाम आहे. त्याचे आर्थिक,सामाजिक आणि एकंदर समाज रचनेत काहीच महत्त्व नाही, असा विचार त्याच्या मनात येणार. पर्यायाने त्याची कष्ट करण्याची, श्रम करण्याची निसर्गाशी तादन्य पावण्याची शक्ती विभागली जाणार हे होण्यापेक्षा तो साक्षर न झालेला बरा असे त्यांचे मत होते. ते म्हणतात, भूगोल, खगोलशास्त्र, बीजगणित, भूमिती हे सर्व विषय मी शिकलो,त्याविषयी मी जाणतो परंतु त्यामुळे मी स्वतःचे किंवा लोकांचे काय भले करू शकलो? त्यांचा हा प्रश्न थेट शिक्षणाच्या प्राप्तार्थाकडे उंगली निर्देश आहे.

शिक्षणाने माणूस स्वार्थी,मतलबी, हेकेखेर, एककल्ली, अभिमानी बनत असेल तर त्याचा काय उपयोग ? हस्ले नावाचा एक जगप्रसिद्ध शिक्षण तज्ञ म्हणतो,''शिक्षणाने शरीराचा विकास होत नसला, आपल्या इंद्रियावर नियंत्रण मिळवता येत नसले,निसर्गाशी सहचर्य निर्माण करण्यात येत नसेल तर ते काही उपयोगाचे नाही यासंदर्भात गांधी आणि हस्ले या दोघांचे एकमत आहे. शिक्षणाने माणूस 'माणूस' होत नसेल तर ते काय उपयोगाचे ? आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून त्यामधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय असल्याचे महात्मा गांधींनी मानले.

गांधींनी केवळ अक्षरज्ञानाला विरोध केला याचा अर्थ त्यांचा शिक्षणाला विरोध होता असा मुळीच नव्हे . ज्या पद्धतीने शिक्षण दिले जाते त्या पद्धतीवर त्यांचा आक्षेप होता. आजची शिक्षण पद्धती घोकंपट्टीवर –पाठांतरावर आधारित आहे. 'रट्टा मारके पढो' अशा परीक्षाप्रधान पध्दतीला त्यांचा विरोध होता.

मॅकोलेच्या शिक्षण पद्धतीवर गांधींचा आक्षेप होता. कदाचित त्यालाही हे अपेक्षित नसावे परंतु या शिक्षण पद्धतीतून गुलामगिरीचे संस्कार मुलांवर केले गेले, असे गांधींचे मत होते. शिक्षण विषयक धोरण आखताना आपली परंपरा,पार्श्वभूमी,भौगोलिक परिस्थिती व परिणाम यांचा विचार आपण केलेला नाही असे त्यांना वाटत होते.आणि ते कीती खरे होते हे आज आपणास दिसते आहे. आज दहावी –बारावी,अभियांत्रिकी–वैद्यकीय प्रवेशाच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्याचे खाजगी व्यवसायिकांचे गल्लोगल्ली भरघोस पीक आलेले आहे,ते एकुण गुणवत्तेच्या अनुंशंगाने शिक्षणविषयी आपण शिक्षक–पालक आणि विद्यार्थी कीती भंपक कल्पनांच्या अहारी गेलो आहोत याचे द्योतक आहे.

'विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास' या ध्येया पासून आपण सगळेजण कोसो दूर गेलेलो आहोत.निव्वळ स्मरणशक्तीवर आधारित या परीक्षांमधून आपण मुलांची केवळ ज्ञानाची परीक्षा घेतो त्याच्या वापराची किंवा उपयोगीतेची,विनियोगाची बाजूच लक्षात घेत नाही.एका बाजूने बहुतेक स्पर्धेसाठी आपण स्पर्धेचे घोडे तयार करत आहोत परंतु माणूस म्हणून जगण्याची त्यांची कोणतीही क्षमता विकसित करून घेत नाही. त्याचाच परिणाम ही मुलं वर्षाला गडगंज पगार मिळवूनही प्रचंड निराशेने ग्रासलेली दिसतात. हुशार, बुद्धिवान मोठ्या पदावर व पगारावर काम करणारे तरुण मुले २२व्या २३व्या वर्षी आत्महत्या करताना दिसतात. जीवनातील आव्हानांचा, संकटांचा सामना कसा करायचा,जीवनाला सामोरे कसे जायचे हे आपण त्यांना कुठेतरी शिक्षण द्यायला कमी पडलेलो आहोत. माणसांना माणसाच्या सहवासाची गरज का आहे,माणूस म्हणजे यंत्र नव्हे,त्याला मन नावाचे न दिसणारे एक इंद्रिय आहे हे समजावून द्यायला आपण सगळेच्या सगळे नापास झालेलो आहोत. आपली शिक्षण व्यवस्था सपशेल नापास झालेली आहे.

म.गांधींनी जे शिक्षण विषयक विचार मांडले ते समजावून घेऊन गांभिर्याने अमलात आणले असते तर जी एक प्रचंड पोकळी जगण्यात दिसते आहे,ती आपल्याला कदाचित दिसली नसती. गांधींचे संपूर्ण जीवन हेच आदर्श शिक्षणाची धारोधार आहे. त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीयुक्तीतून नैतिक शिक्षणाचे धडे दिलेले आहेत. शिक्षणाविषयी त्यांच्या चिंतनातून आणि अनुभवातून आलेले विचार आपल्याला त्यांच्या 'इंडियन होम रूल' तथा 'हिंदवी स्वराज' या त्यांच्या छोट्यशा पुस्तिकेतून पाहायला मिळतात. एकूण एकोणीस प्रकरणाच्या या पुस्तिकेतील १८वे प्रकरण हे शिक्षणावरचे त्यांचे विचार चिंतन आहे. या पुस्तिकेने गांधींना जागतिक विचारवंत म्हणून ख्याती मिळवून दिली. या पुस्तिकेविषयी टॉलस्टॉय म्हणतो,'हे चिंतन फक्त भारतापुरतं मर्यादित नाही तर संपूर्ण जगासाठी ते उपयुक्त आहे.'

जॉन रस्किन यांच्या 'अन टू दि लास्ट' या पुस्तकाचा गांधींवर प्रभाव होता. सर्वोदयाचा विचार, आंतजाचा विचार गांधीच्या मनात पिंगा घालू लागला तो जॉन रस्किन यांच्या पुस्तक वाचनानंतर. शिक्षण हे सर्वांसाठी सर्वांगिन विकास करणारे असायला हवे. त्यात कोणत्या एका वर्गाची मक्तेदारी असता कामा नये. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असले पाहिजे, असे अनेक विचार त्यांनी भारतीय शिक्षण संदर्भात मांडलेले आहेत. 'दि ब्युटीफुल ट्री' असे ते भारतीय शिक्षण पद्धतीला संबोधत असत १९३६ साली महाराष्ट्रात वर्ध्याजवळ सेवाग्राम आश्रमाची गांधींनी स्थापना केली. आणि १९३७ साली वर्ध्यात झालेल्या काँग्रेस परिषदेत त्यांनी आपली मूलोद्योगी

शिक्षण योजना प्रथम मांडली. 'नई तालीम' 'बुनियादी शिक्षा' असेही पर्यायी शब्द या योजनेसाठी वापरले गेले.

'मुलोदयोगी शिक्षण पद्धती' ही म.गांधींनी राष्ट्राला दिलेली शिक्षण विषयक सर्वात नोठी देणगी आहे. या योजनेतील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे—

१. वय वर्ष सात ते चौदा वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण अनिवार्य तथा मोफत असलं पाहिजे.
२. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असले पाहिजे.
३. इंग्रजीचे मुलांच्या शिक्षणात कोणतेच स्थान नसावे.
४. केवळ साक्षरतेला शिक्षण म्हणता येणार नाही.

केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे.शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे. आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे अंतिम प्रयोजन असले पाहिजे, असे गांधींना वाटत होते. ज्ञानाची अभिव्यक्ती करता यायला हवी. आजच्या बुद्धीप्रमाण्य शिक्षण व्यवस्थेत अभिव्यक्तीला जवळजवळ स्थानच नसल्याचे दिसते. घेतलेल्या पदव्यांसाठीचे शिक्षण आणि प्रत्यक्ष व्यवहारात त्या शिक्षणाचा वापर यात फार मोठी तफावत असलेली आपल्याला दिसून येते. अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रात तर खाजगीकरणाच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या संस्था प्रसाद वाटल्याप्रमाणे पदव्यांची खैरात वाटत आहेत. गुणवत्तेचा पूर्ण अभाव असलेल्या या परीक्षाप्रधान भंपक आणि जगाच्या स्पर्धेत कुठेच टिकाव धरू शकत नसलेल्या शिक्षण व्यवस्थेचा आज गांभिर्याने विचार करून पुन:मांडणी करणे आवश्यक आहे.

आजच्या शिक्षणाने पोटापाण्याचे प्रश्न मिटवले जात नाहीत हे जसे वास्तव आहे तसे जीवनाला समर्थपणे सामोरे जायला आणि जबाबदारी पेलण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये ते विकसित करू शकत नाही हे वास्तव नाकारून चालणार नाही. शिक्षणासंदर्भात आपण नेहमी इतरांचे अनुकरण करत आलेलो आहोत. गांधींच्या मते शिक्षण देताना त्या त्या ठिकाणच्या परिसराचा,भौगोलिक परिस्थितीचा, प्रादेशिकतेचा विचार व्हायला हवा. आपल्या बालवाडीत शिकणा—या मुलाला इंग्रजी कवितेतील बर्फ पडलेल्या परिसराचे वर्णन असणारी कविता शिकवायला लागलो तर त्या पोराला घोकंपट्टीशिवाय दुसरे काय हशिल होणार ?दुसरे म्हणजे आपण परकीय भाषेला आजवर अतोनात महत्व देत आलेलो आहोत. इंग्रजी आली नाही तर जणू काही आपल्यावर आभाळ कोसळणार आहे . जगात जगण्यासाठी कुठेच आपल्याला काही करताच येणार नाही हा भ्रम आपण स्वत:च निर्माण करून ठेवलेला आहे आणि उराशी बाळगून आहोत. इंग्रजीची आपण लोकांनी नको तितकी भीती बाळगलेली आहे. वस्तूत: जगातील कितीतरी प्रचंड विकसित असणारे देश ज्यांनी अद्यापही इंग्रजीला आपल्या उंबरठया बाहेरच ठेवलेले आहे. जपान,चीन,रशिया, इज्राईल,फ्रान्स, जर्मनी अशी कितीतरी नावे घेता येतील. या देशातील लोकांनी एक तर इंग्रजी वापरलेलीच नाही किंवा वापरली असेल तर अतिशय मर्यादित अर्थाने फार तर इंग्रजीचा दुय्यम भाषा म्हणून त्यांनी स्वीकार केलेला दिसतो. त्या देशांचे इंग्रजीवाचून काही अडलेले दिसत नाही.

महात्मा गांधी यांनी शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असायला हवे असे आग्रहपूर्वक सांगितले. त्यामुळे श्रवण,भाषण, वाचन, लेखन आणि मनन या क्रिया सोप्या वाटतात, याच क्रियांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विकास घडून येतो. त्यामुळेच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे,असा विचार गांधींचा होता.आज जगभरातील तमाम शिक्षण तज्ज्ञ प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच द्यायला हवे असा आग्रह धरताना दिसतात. गांधींनी जवळजवळ एक शतक आधी हेच सांगितले होते. आपण त्याकडे सोईस्करपणे दु:र्लक्ष केले. शिक्षणाच्या साध्या पेक्षा आपण माध्यमाला महत्त्व दिले. परकीय भाषेला विद्वत्तेचे प्रमाण मानले, त्यामुळे आपल्याकडची शिक्षण व्यवस्था म्हणजे कारकून—नोकर पुरविणारी व्यवस्था ठरलेली आहे. जगातील बहुतांश मोठया कंपण्यांचे सी.ओ. हे भारतीय आहेत. तंत्रज्ञ,कुशल कामगार पुरवीणारा देश म्हणून जग भारताकडे पहातं आहे,हे फार भुषणावह नाही.आजचे जग इनोव्हेशनचे जग आहे.कल्पकता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणा—या शिक्षण व्यवस्थेने ॲमेझॉनचा मालक जेफ बेझोस,फेसबुकचा मालक झुकर बर्क,ॲपलचा मालक स्टीव जॉब्ज आणि नोबल पारितोषिक मिळविणा—या शेकडोंना जन्माला

घातलं आणि आमच्या शैक्षणिक व्यवस्थेने त्यांच्या कंपन्यांना कुशल मनुष्यबळ पुरविलं. इनोवेशन तथा कल्पकता ही आपल्याला विद्यार्थ्यांमध्ये विकसित करताच आली नाही कारण आपण केवळ परदेशी शिक्षणाचे अनुकरण करत राहिलो. परकीय भाषेला विव्दवत्तेचे निकष मानत आलो.

आजची स्थिती विकासाची दिसत असली तरी ती भांडवलशाहीवर आधारित आहे आणि भांडवली विकास प्रक्रियेमध्ये शिक्षण देणारा बेकार ठरतो. सुशिक्षित बेकार भांडवलशाहीचे आपत्य आहे.म.गांधींनी हा धोका फार पूर्वीच ओळखला होता त्यामुळेच 'मूलोद्योग' हे शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे असा आग्रह धरला होता. हातमाग,सुतारकी,लोहारकी, चर्मोद्योग,शेती यांचे शिक्षणात महत्त्व असले पाहिजे,कामालाच ज्ञानाचा दर्जा मिळवून द्यायचा आणि त्यातून श्रमप्रतिष्ठा प्रस्थापित करायची, हे त्यांना अपेक्षित होते. 'खेड्याकडे चला' ही त्यांची संकल्पना आपण पुरेशी समजावून घेतलीलीच दिसत नाही. ती मुलतः मुलोदयोगाशीच संबंधित आहे. त्यांना खेड्यची पुनःर्चना अपेक्षित होती. उत्पादन संबंधाची फेर मांडणी संकल्पपूर्वक केली तर आधुनिक समाजाची निर्मिती होऊ शकेल हे गांधींना माहित होते. खेड्यातून जे व्यावसायिक छोटे छोटे व्यवसाय–उद्योग करत होते त्या लोकांच्या कामालाच ज्ञानाचा दर्जा मिळवून दिला तर श्रमांना प्रतिष्ठा प्राप्त होऊन उत्पादन वाढेल. त्याची गुणवत्ता वाढेल आणि पर्यायाने निरोगी विकास होईल असे त्यांना वाटत होते. अलीकडे विद्यापीठ अनुदान आयोगाने B.Voc सारखे व्यावसायिक कोर्सेस सुरू केलेले आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना अर्थाजनाच्या चांगल्या संधी उपलब्ध होत आहेत.हे फार पुर्वीच व्हायला हवे होते. शिक्षण हे हस्त व्यवसायाशी संबंधित असावे आणि शाळेने तयार केलेल्या विविध वस्तूंच्या विक्रीतून शाळेचा खर्च आणि शिक्षकांचे पगार भागवले जावेत, एवढा व्यापक विचार गांधींनी त्यावेळी केलेला होता. परंतु दुःर्दैवाने कार्यानुभवाच्या नावाखाली एक दिवस मातीच्या वस्तू विद्यार्थ्यांकडून घरून तयार करून आणण्यापलीकडे आपण त्याचा फारसा कधी विकास करू शकलो नाही.

गांधींची 'बेसिक शिक्षा' किंवा 'नई तालीम' आपण समजावून घेतलीच नाही. तिची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली असती तर आपल्या उच्च शिक्षणाचे चित्र आज बरेचसे वेगळे दिसले असते. म.गांधींच्या 'मूलोद्योगी शिक्षण योजने'त आदर्शवाद,निसर्गवाद ,कार्यवाद, प्रयोगवाद आणि सामाजिक पुनःर्रचना या विविध विचारांचा सुंदर समन्वय आपल्याचे दिसून येते. म.गांधींनी केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण मानले नाही. साक्षरता हा शिक्षणाचा प्रारंभ देखील नाही,असे ते म्हणत.आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय असल्याचे त्यांनी मानले.शिक्षणाचा संबंध जीवनाशी जोडला पाहिजे. त्यामुळे अध्ययनात अभिरुची आणि एकाग्रता निर्माण होईल. शिक्षणाचा सहसंबंध जीवनाशी जोडला पाहिजे.त्यामुळे अध्ययनात अभिरूची आणि एकाग्रता निर्माण होईल. शिक्षणाचा सहसंबंध जीवनाशी जोडला पाहिजे.ज्यांच्यासाठी अभ्यासक्रम विकसित करायचा आहे,त्यांचे वय,आवड,अनुभव, क्षमता इत्यादी बाबी विचारात घ्यायला हव्यात .सुजाण नागरिक तयार करणे हा शिक्षणाचा हेतू मानावा हा म.गांधींचा शिक्षणाविषयीचा साधा,सरळ परंतू भारतीय शिक्षणाच्या अनुशंगाने व्यक्त झालेला दृष्टीकोण आहे.

**संदर्भ–**

१.'हिंदू स्वराज' ले.महात्मा गांधी (१९०९),''इंडियन होम रूल,हिंद स्वराज,''अनुवादक–रामदास भटकळ,पॉप्युलर प्रकाशन, ऑक्टो–२०१७

२.म.गांधी–गौरव गंथ,गांधी जन्म शताब्दी निमित्त प्रकाशित,संपादक–दा.न.शिखरे,महाराष्ट्र गांधी स्मारक निधी,पुणे–४